## मद्याच्या बाटलीवर ट्रॅक अँड ट्रेस सुविधेसहहोलोग्राम

**-एकनाथराव खडसे**

अवैध आणि बनावट मद्य विक्रीस आळा घालून शासनास प्राप्त होणाऱ्या महसुलाची गळती थांबविण्यासाठी राज्यात निर्मित,आयात व विक्री होणाऱ्या मद्याच्या बाटल्यांवर ट्रॅक अँड ट्रेस सुविधेसह पॉलिस्टर बेस्ड होलोग्राम लावण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री एकनाथराव खडसे यांनी सांगितले.

या निर्णयाच्या अंमलबजाणीसाठी संबंधित नियमात दुरूस्ती करण्यासह या कामाची निविदा काढण्यासाठीही मान्यता देण्यात आली आहे. तसेच या प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या तात्पुरत्या पर्यवेक्षीय अस्थायी १६ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे. राज्याने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी व नियंत्रण यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे प्रधान सचिव व आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे.

मद्याची प्रत आणि वैधता चटकन ओळखण्यासाठी बाटलीच्या बुचाजवळ होलोग्राम लावण्यात येणार आहे. या होलोग्रामची राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियंत्रणाखाली पुरवठा करण्यात येणार आहे. विभागातील अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली राज्यातील मद्य उत्पादक व आयातदार होलोग्राम लावण्याची कार्यवाही पूर्ण करतील. होलोग्राममध्ये अंतर्भूत असलेल्या वैशिष्ट्यासह ट्रॅक अँड ट्रेस प्रणालीचा सुद्धा समावेश असणार आहे. यामुळे मद्याच्या बाटलीची निर्मिती, स्थळ, दिनांक आदीबाबींसह किरकोळ विक्रेत्यापर्यंतची माहिती प्राप्त होणार आहे. सर्वसामान्य ग्राहकास आपल्या मोबाईलमधील एका विशिष्ट ॲपद्वारे मद्याची वैधता तपासता येणार आहे. १ जुलै पर्यंत होलोग्राम लागु करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

००००००